(निशाणी क्रमांक ०३ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रास वादीचा अतिरीक्त सरतपास न घेता संबंधीत कागदपत्रांना नजरचुकीने निशाणी क्रमांक देण्यात आली होती. त्यामुळे आज रोजी संबंधीत कागदपत्राला निशाणी देण्याकरीता वादी यांचा अतिरीक्त सरतपास नोंदविण्यात येत आहे. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्राला पूर्वीच निशाणी क्रमांक दिली गेल्यामुळे सदय परिस्थितीत सदर कागदपत्राला तिच निशाणी देण्यात येत आहेत, ज्यामुळे सदर कागदपत्राची ओळख करतांना संभ्रम निर्माण होणार नाही.)

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१**

मी शपथेवर सत्यकथन करते की,

माझे नाव – प्रकाश दशरथ खैरनार,

वय:– ६४ वर्षे, धंदा:– वैद्यकिय व्यवसाय,

राहणार:– तपनेश्वर रोड,जामखेड ता. जामखेड, जि. अहमदनगर

**वादी यांचा अतिरीक्त सरतपास वादीचे विधिज्ञ श्री. आर. ई. काळे यांचे मार्फत शपथेवर सुरु:–**

**०१.** माझे पुराव्याचे शपथपत्रातील मजकुर मला वाचुन दाखविण्यात आला व समजावून सांगण्यात आला. तो बरोबर असल्याने मी त्यावर माझी सही आहे. प्रस्तुत साक्षीदाराने त्याचे पुराव्याचे शपथपेत्र शपथेवर सत्यापीत केल्याने त्यास वादीचा सरतपास म्हणून स्विकारण्यात येत आहे. त्यास **निशाणी क्रमांक ५८** देण्यात आलेली आहे.

**०२.** मी पस्तुत दाव्याचे कामी निशाणी क्रमांक ०३ लगत एकूण आठरा, ७/१२ उतारे दाखल केलेले आहेत त्यास **निशाणी क्रमांक ०६ ते २३** देण्यात आलेल्या आहेत. तसेच मी फेरफारचे उता–यांच्या एकूण ०३ प्रमाणित प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यास अनुक्रमे **निशाणी क्रमांक २४ ते २६** देण्यात आलेले आहेत.

**०३.** तसेच, पस्तुत दाव्याचे कामी निशाणी क्रमांक ०३ लगत माझ्या वडीलांनी श्री. ठाकरे यांच्याकडून करुन घेतलेल्या खरेदीखताची प्रमाणित प्रत मी दाखल केलेली आहे. सदर

खरेदीखताच्या प्रमाणित प्रतीस ओळखीकरीता **आर्टीकल "अ"** देण्यात येत आहे. तसेच राजेंद्र कोठारी यांनी श्री. ठाकरे यांच्याकडून करुन घेतलेल्या खरेदीखताची प्रमाणित प्रत मी दाखल केलेली आहे. सदर खरेदीखताच्या प्रमाणित प्रतीस ओळखीकरीता **आर्टीकल "ब"** देण्यात येत आहे. तसेच स्नेहल गायकवाड यांनी श्री. ठाकरे यांच्याकडून करुन घेतलेल्या खरेदीखताची प्रमाणित प्रत मी दाखल केलेली आहे. सदर खरेदीखताच्या प्रमाणित प्रतीस ओळखीकरीता **आर्टीकल "क"** देण्यात येत आहे. तसेच गुगळे यांनी श्री. ठाकरे यांच्याकडून करुन घेतलेल्या खरेदीखताची प्रमाणित प्रत मी दाखल केलेली आहे. सदर खरेदीखताच्या प्रमाणित प्रतीस ओळखीकरीता **आर्टीकल "ड"** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**वादी यांचा उलटतपास प्रतिवादीचे विधिज्ञ श्री. पी. व्ही. गोले यांचे मार्फत शपथेवर सुरु:–**

**०४.** प्रस्तुतचा दावा हा मी माझी १० गुंठे जमीन मला मिळण्याकरीता केला आहे. हे म्हणने खरे आहे की, सदरच्या १० गुंठे क्षेत्र हे माझ्या ताब्यात नाही. हे म्हणने खरे नाही की, सदरचे १० गुंठे क्षेत्र हे माझ्या ताब्यात नाही हे दाखविण्याकरीता मी प्रस्तुत प्रकरणात कोणताही कागदोपत्री पुरावा दाव्यात दाखल केलेला नाही. हे म्हणने खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात मी टी आय एल आर मार्फत मोजणी केल्याबाबतचा नकाशा दाखल केला नाही. हे म्हणने खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल केलेल्या नकाशामध्ये १० गुंठे क्षेत्र हे माझ्या ताब्यात नसल्याबाबतचा सदर नकाशामध्ये कुठेही उल्लेख केलेला नाही.

**०५.** दावा मिळकतीचा मुळ सर्वे क्रमांक व त्याच्या चतु:सिमा मला सांगता येणार नाहीत. सदर सर्वे क्रमांक मधील मिळकतीचा गट नंबर व त्याचे एकूण क्षेत्र मला सांगता येणार नाहीत. गट क्रमांक १३७८ च्या संपुर्ण चतु:सिमा मला सांगता येणार नाहीत. गट क्र. १३७८ च्या एकूण किती वाटण्या झाल्या हे मला सांगता येते. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की सदर गट क्र. १३७८ च्या एकूण पाच वाटण्या झाल्या. सदर पाच वाटण्या पैकी गट क्र. १३७८ मधील तिस–या वाटणीचे क्षेत्र माझे आहे. माझ्या वाटणीतील मिळकतीच्या चतु:सिमा मला सांगता येतील. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की पुर्वेला १० फुट रस्ता, पश्चिमेला नगर–बीड रस्ता आहे, उत्तरेला राजेंद्र कोठारी यांची जमीन व दक्षीणेला स्नेहल गायकवाड यांची जमीन आहे. हे म्हणने

खरे आहे की, सदर चतु:सिमा या प्रस्तुत दावा दाखल करताना होत्या.

**०६.** हे म्हणने खरे आहे की, प्रस्तुतचा दावा दाखल केल्या नंतर गट क्र १३७८ मधील मिळकतींची खरेदी विक्री झालेली आहे. हे म्हणने खरे आहे की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ राजेंद्र कोठारी यांनी गट क्र. १३७८ मधील मिळकत माझ्या अगोदर खरेदी केली होती. गट क्र. १३७८ मधील मिळकत ही माझ्या वडीलांनी दत्तात्रय ठाकरे यांच्याकडून सन १९९२ साली रक्कम रुपये एक लाखात घेतली. सदर गट क्र. १३७८ मधील माझ्या वडीलांनी घेतलेल्या मिळकतीची लांबी रुंदी मला सांगता येईल. त्याची लांबी पुर्व–पश्चिम ५४० फुट व रुदी उत्तर– दक्षिण १३० फुट इतकी आहे. सदरचे क्षेत्र माझ्या वडीलांनी खरेदी करण्यापुर्वी त्याची मोजणी करुन घेतली नव्हती. हे म्हणने खरे आहे की, खरेदी खताच्या वेळी जेवढे क्षेत्र माझ्या वडीलांच्या ताब्यात होते तेवढेच क्षेत्र सध्या माझ्या ताब्यात आहे.

**०७.** हे म्हणने खरे आहे की, माझ्या वडीलांना मी सोडून इतर वारस आहेत. हे म्हणने खरे आहे की, आम्हा भावंडामध्ये दिशा दाखवून किंवा न्यायालयामार्फत वाटप झालेले नाही. प्रस्तुत दावा दाखल करतांना माझ्या वादपत्रात "पुढे वादीच्या वडीलांनी कौटुंबिक वाटपानुसार ही मिळकत वादी यास वाटपा मध्ये दिलेली असून सदरचे वाटपपत्र हे २००९ साली झालेले आहे." हा मजकूर खोटा आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, माझ्या वडीलांनी दावा मिळकत माझ्या नावावर करुन दिलेली आहे.

**(प्रतिवादींचे सुविदय वकील श्री. पी. व्ही. गोले यांच्या तोंडी विनंती वरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.)**

श्रवणोत्तर स्वीकृती,
समक्ष,

सही/–

**(अनुश्री ब. फंड)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांक:– २३/०७/२०२५
ठिकाण:– जामखेड